राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार

तक्रार क्र. रामाआ /१८४/२०२१/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| एस. एस. पडवकर<br>एम. आर. धावडे | सहा. संचालक,ताळमेळ शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे | उपायुक्त (आस्था),विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे |

<u>तक्रार सुनावणी दिनांक :-दि. ११/१२/२०२३</u>

तक्रारदार यांनी दि. २४/०८/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने व्दितीय अपील क्र.५४१०/२०१७/पुणे मध्ये दि.१८/१२/२०२० रोजी आदेश पारित केला. त्यामध्ये विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या जोडपत्र अ मध्ये नमूद परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेशाची अंमलबजवणी केली नाही, अशी तक्रार तक्रारदार यांनी केली आहे."

आयोगाच्या आदेशामध्ये नमुद केले होते की, अपिलार्थींचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा सह संचालक, ताळमेळ शाखा यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मावळ यांचेकडे वर्ग केला होता. यावरुन स्पष्ट होते की, आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती मावळ यांनी करणे आवश्यक होते. अंत: आयोगाच्या आदेशाचे वेळी जे गटविकास अधिकारी होते त्यांनी केलेल्या कार्यवाहीचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

सुनावणीचे वेळी श्रीमती वैशाली कोल्हटकर, सहाय्यक संचालक (लेखा) हया उपस्थित होत्या. त्यांनी संबंधित गटविकास अधिकारी कोण होते व यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती प्राप्त करुन घ्यावी.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश.**

१.विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (लेखा), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्रीमती वैशाली कोल्हटकर यांना आदेशित करण्यांत येते की, त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्तीच्या १५ दिवसांचे आत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मावळ यांनी काय कार्यवाही केली ? याबाबतची माहिती प्राप्त करुन पुढील सुनावणीस संबंधितास कागदपत्रांसह समक्ष हजर राहण्यास सूचित करावे. आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी विहित वेळेत न केल्यास त्यांना काही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील योग्य ती कारवाई करण्यांत येईल, याची दक्षता घ्यावी.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.१८४/२०२१/पुणे/5117दिनांक 13/12/2023